# वाणिज्य मंडळ

# २०१७-१८



# वार्षिक कार्यक्रम

| अ.क्र. | दिनांक | कार्यक्रम | व्याख्याते |
|---|---|---|---|
| १ | १३/०८/२०१७ | व्यक्तिमत्व विकास आणि करिअर इन कॉमर्स | डॉ. अण्णासाहेब गुरव |
| २ | १७/०८/२०१७ | उद्योजक आपल्या भेटीला | श्री. शाळिग्राम खातू |
| ३ | ०३/१०/२०१७ | विमा व्यवसायातील करिअरची संधी | श्री. संतोष वरंडे |
| ४ | ३१/०१/२०१८ | गॅस सिलेंडर संदर्भात जनजागृती कार्यक्रम | श्री. अकूश पिलवलकर |
| ५ | ९-१०/०२/२०१८ | जैवविविध उद्यानाला भेट | श्री. चंद्रकांत तावडे |
| ६ | २२-२३/०२/२०१८ | औद्योगिक सहल (कोल्हापूर) | - |

# सकारात्मक विचारसरणी हाच यशाचा भक्कम पाया असतो
## डॉ अण्णासाहेब गुरव

पाटपन्हाळे कला वाणिज्य व विज्ञान महाविदयालयाच्या वाणिज्य मंडळाच्या वतीने व्यक्तिमत्व विकास व करिअर या विषयावर एकदिवशीय कार्यशाळेचे आयोजन पाटपन्हाळे महाविदयालयात करण्यात आले. या कार्यक्रमाला मार्गदर्शन करण्यासाठी शिवाजी विदयापीठाचे वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे प्रमुख डा अण्णासाहेब गुरव उपस्थित होते. या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डा अण्णासाहेब गुरव यांनी सुरूवातीला कोकणातील विदयार्थ्यांचे विशेष कौतुक करून येथील **विद्यार्थ्यांमध्ये** विविध असणा-या गुणवत्ता स्पष्ट करून सांगितल्या परंतु करिअर करताना विदयार्थि या गुणवत्तेचा फारसा विचार करत नसल्यामुळे गुणवत्ता असून देखील चांगले करिअर करू शकत नसल्याचे स्पष्ट केले.आपल्या विदयार्थ्यांकडे मर्यादित साधने असतात या मर्यादित साधनावरच विकास करणे म्हणजेच व्यक्तिमत्व विकास होय.महाविदयालयात प्रवेश घेतानाच आपले ध्येय निश्चित केल्यास व आपल्या ध्येयाची प्रतिमा मनात तयार झाल्यास संबंधित ध्येयापर्यंत सहज पोहोचता येते. प्रत्येक समस्येमध्ये त्याचे उत्तर असते त्यामुळे ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी सकारात्मक विचारसरणी असेल तर यश मिळविणे सहज सोपे जाते. रत्नागिरी जिल्हयाच्या ग्रामीण भागामध्ये राहून देखील यशाची अपेक्षित उंची गाठणे सहज शक्य आहे.यश मिळविण्यासाठी त्यानी विविध ५५ टिप्स सांगितल्या. ग्रामीण भागात जन्म घेणे ही एक समस्या न मानता ती एक संधी मानल्यास व्यक्तिमत्व विकास व करिअर चांगल्या प्रकारे होवू शकते. प्रत्येक विदयार्थ्यांकडे विविध बलस्थाने असतात परंतू विदयार्थि त्याचा विचार न करता त्यांच्याकडे असणा-या नकारात्मक गोष्टींचाच अधिक विचार करीत असल्यामुळे त्याच्या प्रगतीवर मर्यादा येतात.व्यक्तीमत्व विकासासाठी प्रामाणिकपणा, आत्मविश्वास, स्वताविषयी असणारा आदर, आनंदीपणा, योगासनांचा वापर केल्यास करिअरसाठी त्याचा निश्चित उपयोग होतो हे स्पष्ट केले.डॉ ए पी जे अब्दूलकलाम, कर्मवीर भाउराव पाटील, रामप्रसाद गोएंका, रतन टाटा,लता मंगेशकर, अमिताभ बच्चन,शेक्सपिअर, सुनिल दत्त, बिल गेटस या असामान्य व्यक्तिमत्वानी मर्यादित साधनामध्ये आपले करिअर कशाप्रकारे विकसित केले हे नमुद केले. या व्यक्तीनी आपली परिस्थिती आपल्या प्रगतीच्या समोर कधीही आणली नाही. वाणिज्य शाखेतील विदयार्थ्यांना करिअरसाठी विविध प्रकारच्या संधी कशाप्रकारे उपलब्ध आहेत व महाविदयालयामध्ये असताना त्याची तयारी कशा प्रकारे करावी याचीही विविध प्रकारे माहिती दिली.विदयार्थिना मार्गदर्शन करताना विविध गेमचा वापर करून व्यक्तिमत्व विकासाची माहिती दिली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु वृदांली जाधव हिने तर प्रास्ताविक वाणिज्य मंडळाचे अध्यक्ष कु प्रसाद भेकरे यांनी व आभरप्रदर्शन कु जान्हवी शिरगावकर हिने केला. या कार्यक्रमाला वाणिज्य विभाग प्रमुख प्रा खोत एस एस, प्रा गजभिये लंकेश, प्रा देसाई पी ए, प्रा. मोरे एस एस, **ग्रंथपाल** गुरव व महाविदयालयातील सर्व विदयार्थ्यांची उपस्थिती होती.





रविवार दि. २० ऑगस्ट २०१७ (पृष्ठाक ११)

# सकारात्मक विचारसरणी हाच यशाचा भक्कम पाया

## डॉ. अण्णासाहेब गुरव यांचे प्रतिपादन

शृंगारतळी : ग्रामीण भागात जन्म घेणे ही एक समस्या न मानता ती एक संधी मानल्यास व्यक्तिमत्त्व विकास व करिअर चांगल्याप्रकारे होऊ शकते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे प्रमुख डॉ. अण्णासाहेब गुरव यांनी केले.

येथील पाटपन्हाळे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वाणिज्य मंडळाच्यावतीने व्यक्तिमत्त्व विकास व करिअर या विषयावर एकदिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. कोकणातील विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करुन येथील विद्यार्थ्यांमध्ये विविध असणाऱ्या गुणवत्ता स्पष्ट करुन सांगितल्या. परंतु करिअर करताना विद्यार्थी या गुणवत्तेचा फारसा विचार करीत नसल्यामुळे गुणवत्ता असून देखील चांगले करिअर करु शकत नसल्याचे स्पष्ट केले. आपल्या विद्यार्थ्यांकडे मर्यादित साधने असतात. या मर्यादित साधनावरच विकास करणे म्हणजेच व्यक्तिमत्त्व विकास होय. महाविद्यालयात प्रवेश घेतानाच आपले ध्येय निश्चित केल्यास व त्या ध्येयाची प्रतिमा मनात तयार झाल्यास संबंधित ध्येयापर्यंत पोहोचता येते. प्रत्येक समस्येमध्ये त्याचे उत्तर असते. त्यामुळे ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी सकारात्मक विचारसरणी असेल तर यश मिळविणे सहज सोपे जाते.

रत्नागिरी जिल्ह्याच्या ग्रामीण भागामध्ये राहून देखील यशाची अपेक्षित उंची गाठणे सहज शक्य आहे. यश मिळविण्यासाठी त्यांनी विविध ५५ टिप्स सांगितल्या. प्रत्येक विद्यार्थ्यांकडे विविध बलस्थाने असतात. परंतु विद्यार्थी त्याचा विचार न करता त्यांच्याकडे असणाऱ्या नकारात्मक गोष्टीचाच अधिक विचार करीत असल्यामुळे त्याच्या प्रगतीवर मर्यादा येतात. व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रामाणिकपणा, आत्मविश्वास, स्वतः विषयी असणारा आदर, आनंदीपणा, योगासनांचा वापर केल्यास करिअरसाठी त्याचा निश्चित उपयोग होतो हे स्पष्ट केले.

सूत्रसंचालन वृंदाली जाधव हिने, प्रास्ताविक प्रसाद भेकरे यांनी तर आभार कु. जान्हवी शिरगावकर हिने मानले. या कार्यक्रमाला वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. खोत एस. एस., प्रा. गजभिये लंकेश, प्रा. देसाई पी. ए, मोरे एस. एस, ग्रंथपाल श्री. गुरव व विद्यार्थी उपस्थित होते.



पाटपन्हाळे महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिवाजी विद्यापीठाचे वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे प्रमुख डॉ. अण्णासाहेब गुरव



# कोकणात उदयोजकता विकासाला मोठी संधी- शाळिग्राम खातू

पाटपन्हाळे कला वाणिज्य व विज्ञान महाविदयालयाच्या वाणिज्य मंडळाच्या वतीने उदयोजक आपल्या भेटीला या कार्यक्रमाचे आयोजन पाटपन्हाळे महाविदयालयात करण्यात आले. या कार्यक्रमाला मार्गदर्शन करण्यासाठी रत्नागिरी जिल्हयातील प्रसिध्द उदयोजक मा शाळिग्राम खातू उपस्थित होते. या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना शाळिग्राम खातू यांनी सुरूवातीला कोकणातील विदयार्थ्यांचे विशेष कौतुक करून येथील विदयार्थ्यामध्ये विविध असणा-या गुणवत्ता स्पष्ट करून सांगितल्या परंतु करिअर करताना विदयार्थि या केवळ नोकरीचा विचार करतो व आपल्याकडे असणा-या गुणवत्तेचा फारसा विचार करत नसल्यामुळे गुणवत्ता असून देखील चांगले चांगले उदयोजक होवू शकत नसल्याचे स्पष्ट केले. उदयोजकतेमध्ये यशस्वी होण्यासाठी कष्ट करण्याशिवाय कोणताही पर्याय नसल्याचे त्यानी स्पष्ट केले. आर्थिक परिस्थितीचा नकारात्मक विचार न करता ती एक संधी मानल्यास उदयोजक विकासाला फारशी अडचण येत नाही. महाराष्टातील व भारतातील अनेक उदयोजक आर्थिक परिस्थिती नसताना देखील कष्ट व मेहनत यांच्या जोरावर कसे घडले हे विविध उदाहरणाच्या आधारे प्रभावीपणे स्पष्ट केले. खातू मसाले उदयोगाची उभारणी करताना सुरूवातीला त्याना कोणत्याकोणत्या अडचणी आल्या व व्यवसाय वाढविताना कोणत्या संकटाना सामोरे जावे लागले स्पष्ट केले.कोणताही व्यवयाय करताना अपार कष्ट, श्रध्दा व मेहनत या गोष्टी आपल्याला शिखरापर्यंत पोहोचवू शकतात. व्यवसाय कोणता करावा यासंदर्भात त्यानी व्यवसायाच्या संधी कशाप्रकारे शोधावा याचे सविस्तर विवेचन केले.कष्ट करण्याची तयारी असेल तर बॅंकादेखील आपल्याला सहज कर्जपुरवठा करू शकतात. आपल्या वस्तूचा ब्रॅन्ड तयार झाल्यास ग्राहक बिनधास्त आपल्या वस्तूवर विश्वास ठेवतात. त्यामुळेच खातू मसाले उदयोगाची भरारी केवळ गुहागर पुरती मर्यादित न राहता संपुर्ण रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर व मुंबईपर्यंतजावून पोहोचली. विदयार्थि दशेमध्ये उदयोजकतेचा शोध कसा घ्यावा की जेणे करून भविष्यात मोठे उदयोजक होता येईल हे त्यानी विविध उदाहरणाद्वारे स्पष्ट केले. कोकणातील बहुतेक विदयार्थ्यांकडे गुणवत्ता भरपुर प्रमाणात आहे त्याचा वापर महाविदयालयीनजीवनापासुन केल्यास व केवळ नोकरीच्या मागे न लागल्यास कोकणामध्ये मोठे उदयोजक घडू शकतात असा आशावाद त्यानी केला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन क सुमैया हिने तर प्रास्ताविक कु अनिरूध्द जोशी यांनी व आभार प्रदर्शन कु ऋुषीकेश जोशी याने केला. या कार्यक्रमाला वाणिज्य विभागप्रमुख प्रा खोत एस एस, प्रा गजभिये लंकेश, प्रा देसाई पी ए, प्रा. शिंदे के आर, ग्रंथपाल गुरव व महाविदयालयातील सर्व विदयार्थ्यांची उपस्थिती होती.









# कोकणात उद्योजकता विकासाला मोठी संधी : शाळीग्राम खातू

**गुहागर : प्रतिनिधी**

कोकणातील विद्यार्थी केवळ नोकरीचा विचार करीत असल्याने गुणवत्ता असूनही चांगले उद्योजक तयार होत नाहीत. उद्योगधंद्यात यशस्वी होण्यासाठी अपार कष्टाशिवाय पर्याय नाही. कोकणात उद्योजकता विकासाला मोठी संधी आहे. आर्थिक परिस्थितीचा नकारात्मक विचार न करता ती एक संधी मानल्यास उद्योजक विकासात फारशी अडचण येत नाही, असे मत उद्योजक शाळीग्राम खातू यांनी व्यक्त केले.

पाटपन्हाळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात 'उद्योजक आपल्या भेटीला' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उद्योजक शाळीग्राम खातू यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. वाणिज्य मंडळाच्यावतीने हा कार्यक्रम पार पडला.



**चिपळूण : पाटपन्हाळे महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना उद्योजक शाळीग्राम खातू.व्यासपीठावर अन्य मान्यवर.**

यावेळी खातू यांनी कोकणातील विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी देश व राज्यातील अनेक उद्योजक आर्थिक परिस्थिती नसतानादेखील कष्ट व मेहनतीच्या जोरावर कसे घडले हे विविध उदाहरणांच्या आधारे खातू यांनी स्पष्ट केले.

खातू म्हणाले, आपल्या उद्योगाची उभारणी करताना कोणत्या अडचणी आल्या, व्यवसाय वाढविताना कोणत्या संकटांना सामोरे जावे लागले या सर्व गोष्टी उलगडल्या. व्यवसाय कोणता करावा या संदर्भात व्यवसायाच्या संधी कशा शोधाव्यात याचे विवेचन केले. कष्ट करण्याची तयारी असेल तर आपल्याला सहजरित्या कर्ज मिळू शकते. विद्यार्थीदशेतच उद्योजक होण्याच्या दृष्टीने विचार करणे गरजेचे आहे. कोकणातील पान २ वर ▶

येणार आहे.

## कोकणात उद्योजकता विकासाला मोठी संधी

बहुतांश विद्यार्थ्यांकडे गुणवत्ता भरपूर प्रमाणात आहे. त्याचा वापर महाविद्यालयीन जीवनापासून केल्यास व केवळ नोकरीच्या मागे न लागल्यास कोकणातही मोठे उद्योजक घडू शकतात, असा आशावाद खातू यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुमैया हिने केले. अनिरूद्ध जोशी यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमास वाणिज्य विभागप्रमुख प्रा. एस. एस. खोत, प्रा. लंकेश गजभिये, प्रा. पी. ए. देसाई, प्रा. शिंदे, ग्रंथपाल गुरव आदींची उपस्थिती होती.

# विमा व्यवसायात करिअरसाठी सर्वोत्कृष्ठ संधी - संतोष वरंडे

पाटपन्हाळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वाणिज्य मंडळातर्फे मंगळवार दि. ३ ऑक्टोंबर २०१७ रोजी विमा व्यवसायातील करिअरची संधी या विषयावर रत्नागिरी जिल्ह्यातील विमा व्यवसायामध्ये नावलौकीक असणारे श्री. संतोष वरंडे यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये मानवी जिवनामध्ये विम्याची गरज अन्न, वस्त्र व निवारा याबरोबरच कशारितीने महत्वाची आहे हे स्पष्ट केले. मानवी जिवनात असणारे धोके, भौतिक वस्तूंना असणारे धोके व आजच्या जिवनामध्ये असणारी अनिश्चितता यामुळे विमा कशाप्रकारे उपयोगाचा ठरतो हे विविध उदाहरणे देऊन स्पष्ट केले. विम्याची गरज गरीब व्यक्तींपासून श्रीमंत व्यक्तींपर्यंत सर्वांनाच आवश्यक असते. विमा घेतांना सद्याच्या काळात आयुर्विमा महामंडळाबरोबरच अनेक खाजगी कंपन्या देखील यामध्ये अस्तित्वात असून साहजिकच त्याचा जास्त फायदा विमा ग्राहकांना कशाप्रकारे होत आहे हे स्पष्ट केले. भारतामध्ये १३० करोड जनतेपैकी फक्त ३० करोड लोकांचाच विमा असून बाकीची जनता विम्यापासून विशेषतः ग्रामीण भाग वंचित आहे. त्यामुळे या व्यवसायात मोठ्या प्रमाणात विकासाची क्षमता असल्यामुळे करिअर करण्यासाठी विमा क्षेत्र हे सर्वोत्कृष्ठ असणारे क्षेत्र आहे. विमा सल्लागार किंवा विमाप्रतिनिधी म्हणून महाविद्यालयीन जिवनापासूनच किंवा शिक्षण पुर्ण झाल्यावर देखील करता येते. तसेच पुर्णवेळ किंवा अर्धवेळ देखील या व्यवसायामध्ये काम करता येते. पुर्णवेळ काम केल्यानंतर कशा प्रकारे त्याचे फायदे मिळतात हे विविध उदाहरणांच्या आधारे स्पष्ट केले. तसेच विमा प्रतिनिधी किंवा सल्लागार होण्यासाठी कोणत्याही प्रकारे भांडवलाची गरज नसून केवळ आपल्या व्यक्तिमत्वातील असणारे चांगले गुणच त्याच्यासाठी उपयुक्त ठरतात. या व्यवसायात पुर्ण क्षमतेने काम केल्यास इतर क्षेत्रापेक्षा निश्चितच या व्यवसायामध्ये चांगले करिअर होऊ शकते हे पटवून देतांना त्यांनी त्यांच्या आयुष्यामध्ये आलेल्या विविध प्रसंगांचा उल्लेख केला. प्राथमिक शिक्षकाची नोकरी सोडून या क्षेत्राचा त्याने कशाप्रकारे वापर केला हे विद्यार्थ्यांना सांगितले. याचबरोबर विविध कंपन्यांच्या असणाऱ्या विमा पॉलिसी, विमा प्रतिनिधींसाठी घ्यावयाचे प्रशिक्षण याचीही माहिती दिली. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कुमारी रोहिणी जाधव, प्रस्तावना कुमारी कामिनी सकपाळ व आभार प्रदर्शन मोहिनी मोहित हिने केले. सदर कार्यक्रमाला पाटपन्हाळे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य श्री. प्रवीण सनये, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. सुभाष खोत, प्रा. लंकेश गजभिये व प्रा. क्रिष्णाजी शिंधे हे उपस्थित होते.











लोकमत



# विमा क्षेत्रात करिअरची संधी

## संतोष वरंडे : पाटपन्हाळे महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क



गुहागर तालुक्यातील पाटपन्हाळे महाविद्यालयात 'विमा व्यवसायातील करिअरची संधी' कार्यक्रमात संतोष वरंडे यांनी मार्गदर्शन केले.

**गुहागर :** विम्याची गरज गरीब व्यक्तीपासून श्रीमंत व्यक्तीपर्यंत सर्वांनाच असते. आयुर्विमा महामंडळाबरोबरच अनेक खासगी कंपन्यादेखील विमामध्ये अस्तित्वात आहेत. विमा व्यवसाय करिअरसाठी सर्वोत्कृष्ट असल्याचे मत संतोष वरंडे यांनी व्यक्त केले.

तालुक्यातील पाटपन्हाळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वाणिज्य मंडळातर्फे 'विमा व्यवसायातील करिअरची संधी' यावर संतोष वरंडे यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

भारतामध्ये १३० करोड जनतेपैकी फक्त ३० करोड लोकांचाच विमा असून, बाकीची जनता विम्यापासून वंचित आहे. त्यामुळे या व्यवसायात मोठ्या प्रमाणात विकासाची क्षमता असल्यामुळे करिअर करण्यासाठी विमा हे सर्वोत्कृष्ट क्षेत्र आहे. विमा सल्लागार किंवा विमा प्रतिनिधी म्हणून महाविद्यालयीन जीवनापासूनच किंवा शिक्षण पूर्ण झाल्यावरदेखील काम करता येते. तसेच पूर्णवेळ किंवा अर्धवेळदेखील या व्यवसायामध्ये काम करता येते, असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाला पाटपन्हाळे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रवीण सनये, वाणिज्य विभागप्रमुख प्रा. सुभाष खोत, प्रा. लंकेश गजभिये व प्रा. कृष्णाजी शिंदे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहिणी जाधव हिने केले. प्रस्तावना कामिनी सकपाळ हिने केली तर मोहिनी मोहिते हिने आभार मानले.

लोकमत

II रत्नागिरी, शनिवार, दि. १४ ऑक्टोबर २०१७

विमा क्षेत्रात करिअरची संधी

संतोष वरंडे : पाटपन्हाळे महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क



गुहागर तालुक्यातील पाटपन्हाळे महाविद्यालयात 'विमा व्यवसायातील करिअरची संधी' कार्यक्रमात संतोष वरंडे यांनी मार्गदर्शन केले.

गुहागर : विम्याची गरज गरीब व्यक्तीपासून श्रीमंत व्यक्तीपर्यंत सर्वांनाच असते. आयुर्विमा महामंडळाबरोबरच अनेक खासगी कंपन्यादेखील विमामध्ये अस्तित्वात आहेत. विमा व्यवसाय करिअरसाठी सर्वोत्कृष्ट असल्याचे मत संतोष वरंडे यांनी व्यक्त केले.

तालुक्यातील पाटपन्हाळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वाणिज्य मंडळातर्फे 'विमा व्यवसायातील करिअरची संधी' यावर संतोष वरंडे यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

भारतामध्ये १३० करोड जनतेपैकी फक्त ३० करोड लोकांचाच विमा असून, बाकीची जनता विम्यापासून वंचित आहे. त्यामुळे या व्यवसायात मोठ्या प्रमाणात विकासाची क्षमता असल्यामुळे करिअर करण्यासाठी विमा हे सर्वोत्कृष्ट क्षेत्र आहे. विमा सल्लागार किंवा विमा प्रतिनिधी म्हणून महाविद्यालयीन जीवनापासूनच किंवा शिक्षण पूर्ण झाल्यावरदेखील काम करता येते. तसेच पूर्णवेळ किंवा अर्धवेळदेखील या व्यवसायामध्ये काम करता येते, असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाला पाटपन्हाळे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रवीण सनये, वाणिज्य विभागप्रमुख प्रा. सुभाष खोत, प्रा. लंकेश गजभिये व प्रा. कृष्णाजी शिंदे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहिणी जाधव हिने केले. प्रस्तावना कामिनी सकपाळ हिने केली तर मोहिनी मोहिते हिने आभार मानले.

# गॅस सिलेंडर संदर्भात जनजागृती कार्यक्रम

बुधवार दि. ३१ जानेवारी २०१८ रोजी गॅस सिलेंडर संदर्भात जनजागृती कार्यक्रम हाती घेण्यात आला. प्रत्येक घरी गॅस सिलेंडरचा वापर करण्यात येतो परंतू तो कसा हाताळावा, आणीबाणीच्या परिस्थितीत त्याची काळजी कशी घ्यावी, अशावेळी कोणत्या गोष्टी कराव्यात, कोणत्या गोष्टी टाळाव्यात की जेणेकरून मोठी दुर्घटना होणार नाही. यासंदर्भात इंडियन गॅसचे तळवलीचे वितरक श्री. अंकूश पिलवलकर यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी या संदर्भात विविध प्रात्याक्षिके करून दाखविली व विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना उत्तरे दिली. यावेळी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वर्ग व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.










# जैवविविध उद्यानाला भेट
# श्री. चंद्रकांत तावडे

दि. ९ व १० फेब्रूवारी २०१८ रोजी महाविद्यालयातील प्रथम व द्वितीय वर्ष वाणिज्य वर्गातील सर्व विद्यार्थ्यांनी चिखली येथील स्व. उत्तमराव पाटील जैवविविध उद्यानाला भेट देऊन तेथील पक्षी, वनस्पती यांची योग्य अशी माहिती घेतली. तेथील घनदाट निसर्गरम्य वातावरणाचा आनंद विद्यार्थ्यांनी लुटला. यावेळी जैवविविध उद्यानाचे असणारे महत्त्व वनपाल श्री. चंद्रकांत तावडे यांनी स्पष्ट केले.

दैनिक सागर रत्नागिरी Ratnagiri

Arts Commerce & Science Patpanhale Tal.Guhagar Dist.Ratnagiri

दि. १५/२/२०१८

## पाटपन्हाळे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दिली जैवविविधता उद्यानाला भेट

शृंगारतळी : गुहागर तालुक्यातील चिखली येथील स्व. उत्तमराव पाटील जैवविविधता उद्यानात पाटपन्हाळेच्या कला वाणिज्य महाविद्यालयाच्या वनभोजनाचे अवचित्य साधून सर्व विद्यार्थ्यांनी विविध वनस्पतींची माहिती घेतली.

यावेळी पक्षांचे निरीक्षण व घनदाट निसर्गरम्य वातावरणाचा आनंद विद्यार्थ्यांनी घेतला.

यावेळी पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ, उद्यान कमिटी अध्यक्ष भगवान कदम, पाटपन्हाळे कॉलेजचे



पाटपन्हाळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विविध वनस्पतींची माहिती देताना वनपाल चंद्रकांत तावडे, सोबत उद्यान कमिटी अध्यक्ष भगवान कदम, पाटपन्हाळे कॉलेजचे प्राध्यापक श्री. खोत, श्री. गजभिये. प्राध्यापक श्री. खोत, श्री. गजभिये आदि उपस्थित होते.

Patpanhale Arts, Commerce and Science College LIBRARY Tal. Guhagar, Dist. Ratnagiri

दि. २०/२/२०१८

कोकणचे सर्वाधिक खपाचे दैनिक
रत्नागिरी टाइम्स



गुहागर तालुक्यातील चिखली जैवविविधता उद्यानात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मान्यवर.सोबत प्राध्यापक.

## चिखलीतील उद्यानात विद्यार्थ्यांनी घेतला वनभोजनाचा आनंद

उमराठ (गुहागर), १९ फेब्रु. (वार्ताहर) - गुहागर तालुक्यातील चिखलीतील स्व. उत्तमराव पाटील जैवविविधता उद्यानात पाटपन्हाळे वरिष्ठ महाविद्यालय वरिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वनभोजनाचा आस्वाद घेतला. युवकांनी विविध वृक्ष, पक्षीयांचे निरीक्षण करून माहिती घेतली. वनपाल चंद्रकांत तावडे यांनी उद्यानाबाबत माहिती दिली.

यावेळी गुहागरचे पो. नि. देवेंद्र पोळ, वनपाल चंद्रकांत तावडे, उद्यान कमिटी अध्यक्ष भगवान कदम, ग्रामस्थ संदीप मांडवकर, प्रा. खोत, प्रा. गजभिये उपस्थित होते.

# औद्योगिक सहल - कोल्हापूर

दि. २२ व २३ फेब्रूवारी २०१८ रोजी महाविद्यालयाच्या तृतीय वर्ष वाणिज्य शाखेची औद्योगिक सहल दोन दिवसांची आयोजीत करण्यात आली होती. यामध्ये गोकूळ दुग्ध संघ, जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्यादित, हुपरी या ठिकाणांना भेटी दिल्या. यामध्ये त्याठिकाणी होणारे उत्पादन, व्यवस्थापन, विपणन, संग्रहण, प्रक्रिया इ.विषयी मुलांना सविस्तर माहिती मिळाली.









कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ

